दिनांक ३०.११.२०१९

आज रोजी १७ वा महाराष्ट्र पोलीस कर्तव्य मेळाव्याच्या समारोप सोहळयाचे प्रमुख पाहुणे मा. श्री सुबोध कुमार जायस्वाल, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते व अध्यक्ष मा. श्री अतुलचंद्र कुलकर्णी, अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या उपस्थितीत अत्यंत उत्साहात दिमाखदार सोहळा पार पडला.

सहभागी स्पर्धक संघांनी मान्यवरांना लयबद्ध व शिस्तबद्ध संचलन करून मानवंदना दिली. त्यानंतर श्री अतुलचंद्र कुलकर्णी, अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., महाराष्ट्र राज्य, पुणे प्रास्ताविक करून कार्यक्रमाची सुरूवात केली. त्यामध्ये त्यांनी कार्यक्रमाचा उद्देश व ध्येय याबाबत मनोगत व्यक्त करताना माहिती दिली की, यावर्षी हा पोलीस कर्तव्य मेळावा दिनांक २५/११/२०१९ ते दि. ३०/११/२०१९ दरम्यान आयोजित करण्यात आला. सदर पोलीस कर्तव्य मेळाव्यातील विविध स्पर्धांचा उद्देश हा पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे व्यावसायिक कौशल्य, नैपुण्य व कार्यक्षमता यांचा दर्जा वाढविणे आहे. सदर पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये वेगवेगळया ६ प्रकारच्या स्पर्धांचा समावेश होता. १७ व्या महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये ९ परिक्षेत्र, १० आयुक्तालये, गुन्हे अन्वेषण विभाग, राज्य राखीव पोलीस बल, बिनतारी संदेश विभाग, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, दहशतवाद विरोधी पथक, फोर्स वन मुंबई, राज्य गुप्तवार्ता विभाग असे २५ संघ सहभागी झाले होते. या स्पर्धेतुन यशस्वी झालेले अधिकारी व कर्मचारी यांची निवड अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्याकरीता करण्यात येते.

६२ वा अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळावा लखनऊ, उत्तरप्रदेश येथे संपन्न झाला. त्यामध्ये संपुर्ण देशातुन एकुण २७ राज्य/संघराज्याच्या संघानी सहभाग नोंदविला होता. सदर स्पर्धेमध्ये महाराष्ट्र राज्य पोलीस दलाच्या संघाच्या वतीने एकुण ४० स्पर्धक सहभागी झाले होते. त्यामध्ये महाराष्ट्र राज्य पोलीस दलाच्या संघाने पहिल्यांदाच **देशातील प्रथम क्रमांकाचा संघ म्हणुन जनरल चॅम्पियनशिप ट्रॉफी** मिळवुन महाराष्ट्र पोलीस दलासाठी ऐतिहासिक कामगिरी केली आहे. त्याचप्रमाणे **Scientific Aid to Investigation** (विज्ञान शास्त्राची तपासात मदत) या स्पर्धाप्रकारामध्ये **हार्ड लाईनर ट्रॉफी** व पोलीस व्हिडीओग्राफी या स्पर्धेची **रनर अप ट्रॉफी** मिळवुन दैदिप्यमान कामगिरी केली आहे. त्यामध्ये महाराष्ट्र राज्य पोलीस दलाचे संघाने ५ सुवर्ण , ३ रौप्य व ४ कास्यं असे एकुण १२ पदके प्राप्त केली आहेत.

१७ वा महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा-२०१९ मध्ये पदकप्राप्त विजेत्यांचे व चषकप्राप्त संघांचे मी मन:पुर्वक अभिनंदन करतो व आगामी ६३ वा अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये महाराष्ट्र संघ दैदिप्यमान कामगिरी करेल अशी आशा व्यक्त करतो व गतवर्षी प्रमाणेच यावर्षीही **जनरल चॅम्पियनशिप ट्रॉफी** मिळवुन कामगीरीमध्ये सातत्य राखावे यासाठी महाराष्ट्र पोलीस दलाचे संघास शुभेच्छा देतो.

पुढे अधिक माहिती देताना श्री अतुलचंद्र कुलकर्णी यांनी उल्लेख केला की, गुन्हे अन्वेषण विभागाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर त्यांच्या असे निदर्शनास आले आहे की, गु.अ.वि. मध्ये दर महा गुन्हे व गुन्हेगार तसेच तपासासाठी आवश्यक माहितींचे संकलन केले जाते. ही माहिती जर इतर पोलीस घटकांना दिली तर त्याचा उपयोग घटकांतील पोलिसांना योग्य निर्णय घेणेसाठी, तसेच प्रतिबंधात्मक कारवाई करण्यासाठी व व्यवसायीक तपासादरम्यान फायदा होवू शकतो. या बुलेटीनद्वारे आम्ही सर्व घटकांना खालील विषयांवर माहिती देण्याचा सर्वोत्तम प्रयत्न केला आहे. त्यातील प्रमुख घटक - वेगवेगळे गुन्हे शिर्षक त्यांची विश्लेषणात्मक माहिती, फरारी आरोपी, गुन्हयांची दोषसिद्धी इत्यादी. तसेच यामध्ये CCTNS ची आजपर्यंतची वाटचाल इंटरपोल, एफ.आय.सी.एन. या बाबतची माहिती आणि न्यायालयातील सर्वोत्तम निकालांची वाचणीय माहिती चे संकलन केले आहे. याचा प्रत्येक पोलीस घटकाला पुरेपूर फायदा होईल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. सी.आय.डी. बुलेटीन (१ जानेवारी ते सप्टेंबर २०१९) चे प्रकाशन

१. मा. श्री सुबोध कुमार जायस्वाल, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. डॉ. के. व्यंकटेशम्, पोलीस आयुक्त, पुणे शहर.
३. श्री. संदिप बिश्नोई, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड.
४. मा. श्री अतुलचंद्र कुलकर्णी, अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. श्री. कुलवंत कुमार, अपर पोलीस महासंचालक, आस्थापना, महाराष्ट्र राज्य, पुणे,
६. श्री. रितेश कुमार, अपर पोलीस महासंचालक, बिनतारी संदेश विभाग महाराष्ट्र राज्य, पुणे,
७. श्री. सुनिल रामानंद, अपर पोलीस महासंचालक, सुधारगृह, महाराष्ट्र राज्य, पुणे,
८. श्री प्रविण साळुंखे, विशेष पोलीस महानिरीक्षक, गुन्हे पश्चिम, गु.अ.वि., पुणे.
९. श्री दत्तात्रय मंडलिक, विशेष पोलीस महानिरीक्षक, रा.गु.अ.कें., गु.अ.वि., पुणे.
१०. श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस अधिक्षक, का.व सं., गु.अ.वि., पुणे.
११. श्रीमती आरती बनसोडे, अपर पोलीस अधीक्षक, सांख्यिकी, गु.अ.वि., पुणे.

यांच्या हस्ते करण्यात आले.

सर्व सन्माननीय सदस्य यांनी अथक परिश्रम घेतले याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. तसेच पदक विजेते स्पर्धक हे आगामी ६३ व्या अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यात सहभागी होणा-या महाराष्ट्र पोलीस संघासाठी घवघवीत यश प्राप्त करुन देतील ही अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

१७ वा महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्याच्या समारोप कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. श्री सुबोध कुमार जायस्वाल, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या भाषणामध्ये पदकप्राप्त विजेत्यांचे व चषकप्राप्त संघांचे त्यांनी मन:पुर्वक अभिनंदन केले व आगामी ६३ वा अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये महाराष्ट्र संघ दैदिप्यमान कामगिरी करेल अशी आशा व्यक्त केली व

गतवर्षी  प्रमाणेच यावर्षीही **जनरल चॅम्पियनशिप ट्रॉफी** मिळवुन कामगीरीमध्ये सातत्य राखावे यासाठी महाराष्ट्र पोलीस दलाचे संघास शुभेच्छा दिल्या व सर्व स्पर्धकांना स्पर्धेतील कौशल्याचा उपयोग व्यवसायीक पोलिसींगमध्ये करताना दोषसिद्धीचे प्रमाण वाढविण्याची इच्छा व्यक्त केली.

या नंतर श्वानपथकांनी आपला तपासातील सहभागासंबंधीची प्रात्याक्षीके करून दाखवली त्यानंतर पाईप बँड यांनी अत्यंत सुगम व सुरल लयबद्ध प्रात्याक्षीक सादर केले.

या स्पर्धे दरम्यान सांघीक विजेतेपद मिळवणाऱ्या संघांचे पारितोषिक देवून अभिनंदन केले. त्यांचा निकाल खालील प्रमाणे.

**जनरल चॅम्पीअन शिप ट्रॉफी :-** या स्पर्धा प्रकारात पुणे शहर या संघाने २ सुवर्ण पदक, ४ रौप्य पदक व १ कास्य पदक मिळवून जनरल चॅम्पीअन शिप ट्रॉफी शिक्का मोर्तब केला.

**रनर अप ट्रॉफी** :- या स्पर्धा प्रकारात कोकण रेंज या संघाने ३ सुवर्ण पदक, १ रौप्य पदक व १ कास्य पदक मिळवून रनर अप ट्रॉफी प्राप्त केली.

**सायंटीफीक ऐड टु इन्वेस्टीगेशन चषक :-** या स्पर्धा प्रकारात नवी मुंबई शहर संघाने २५४.४१ गुण मिळवून फिरता चषक प्राप्त केला.

**पोलीस फोटोग्राफर चषक :-** या स्पर्धा प्रकारात नाशिक परिक्षेत्राने ७३.५ गुण मिळवून फिरता चषक प्राप्त केला.

**पोलीस व्हीडीओ ग्राफी चषक :-** या स्पर्धा प्रकारात पुणे शहर संघाने ८४ गुण मिळवून फिरता चषक प्राप्त केला. तसेच कोल्हापुर परिक्षेत्र संघाने ८०.५० गुण मिळवून द्वीतीय क्रमांक प्राप्त केला.

**ॲन्टी सॅबोटेज चेक चषक :-** या स्पर्धा प्रकारात फोर्स वन संघाने २३२ गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला तसेच अशोक कामठे फिरता चषक प्राप्त केला. तसेच एम.आय.ए.  संघाने २२० गुण मिळवून द्वीतीय क्रमांक प्राप्त केला.

**कॉम्प्युटर अवेअरनेस चषक :-** या स्पर्धा प्रकारात नांदेड परिक्षेत्र संघाने १८१.३८ गुण मिळवून फिरता चषक प्राप्त केला.

**डॉग स्कॉड चषक :-** या स्पर्धा प्रकारात अमरावती परिक्षेत्र संघाच्या लुसी श्वानाने ३५० गुण मिळवून प्रथम क्रमांक प्राप्त केला.























